# मुंबई विद्यापीठ

PhoneNo.-022-22708741
Email - concolsection@gmail.com

College Teachers Approval Unit
Room No. 205
Fort Campus, M.G. Road Mumbai-32

संदर्भ क्र. टीएएस(भशि)/आयसीडी/२०-२१/ 30 दि.: ~~फेब्रुवारी~~ २०२१ ८ मार्च

परिपत्रक :

विषय : विद्यापीठ शिक्षकांच्या संगणकीय नोंदणीबाबत
संदर्भ : परिपत्रक क्र. संलग्नता / आयसीसी / २०१७-१८/०३, दिनांक २८ एप्रिल, २०१७

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख / संचालक तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालय / संस्था यांचे प्राचार्य तथा संचालक यांना कळविण्यात येते की, विद्यापीठातील सर्व शिक्षकांच्या नियुक्ती / पदोन्नती / मान्यता या सर्व संबधीची संपुर्ण प्रक्रिया संगणकाच्या माध्यमातून Online प्रणाली द्वारे सुरु करण्यात आल्या आहेत. सदर बाब आपणांस विद्यापीठाच्या उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाद्वारे या अगोदरच कळविण्यात आलेली आहे. मात्र अनेक विभागांनी / महाविद्यालयांनी त्यांच्या विभागातील / महाविद्यालयातील निवृत्त झालेले प्राचार्य / शिक्षक यांची माहिती अजूनही ऑनलाईन प्रणालीतून वगळलेली नाही. तसेच ज्या शिक्षकांना विद्यापीठाद्वारे मान्यता मिळालेली आहे त्यांची माहिती अजून ऑनलाईन प्रणालीद्वारे भरण्यात आलेली नाही. सदर प्रक्रियेसाठी मान्यता मिळालेल्या शिक्षकांची नोंदणी केलेली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

महाविद्यालयांच्या तपासणीसाठी जाणाऱ्या शिक्षक निवडीसाठी निवड समिती (Selection Committee) / आश्वासित प्रगती योजनेसाठी तज्ञ समिती (Selection / Screening Committee) / तसेच मा. कुलगुरूंचे प्रतिनिधी अशा विविध समित्यांवर नामनिर्देशन करणे, समित्यांचे अहवाल स्वीकारणे, अहवालास मान्यता देणे व पात्र शिक्षकांना मान्यता पत्र देणे, इत्यादी सर्व कार्यवाही संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून Online प्रक्रियेद्वारे केली जाणार आहे. यासाठी विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख / प्राचार्य तथा संचालक यांनी आपल्या विभागातील / महाविद्यालयातील कायमस्वरूपी / नियमित शिक्षकांचे Login Id या प्रणालीद्वारे प्रदान करणे अनिवार्य आहे. तसेच यापुढे सर्व पत्र व्यवहार शिक्षकांच्या सदर Login ID मध्येच उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे विभागातील सर्व कायमस्वरूपी नियमित शिक्षकांची नोंदणी होणे आवश्यक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

त्या अनुषंगाने कायमस्वरूपी नियमित शिक्षकांचे Login Id साठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ) https://muonline.org.in या संकेतस्थळाला भेट द्यावी व Affiliation Section या टॅबला क्लीक करावे.

क) तेथील College Information या टॅबला व त्यातील Teaching Staff या लिंकवर क्लीक करावे व Add / Register Teaching Staff या लिंकचा वापर करून नियमित शिक्षकांची नोंदणी करावी.

ड) त्यानंतर Teaching Staff Section मधील Manage Teaching Staff या लिंकचा वापर करून नियमित शिक्षकांचे आयडी त्यांना प्रदान करावेत.

उपरोक्त प्रक्रियेत आपआपल्या विभागातील फक्त कायमस्वरूपी नियमित शिक्षकांच्या (Regular Teacher) प्रस्तावांची नोंदणी करावी. तात्पुरते शिक्षक, (Ad-hoc) शिक्षक , तासिका तत्वावरील शिक्षक, अभ्यागत (Visiting) शिक्षक, ६ महिने किंवा ११ महिने कालावधी (Tenure) तत्वावरील नियुक्त झालेले शिक्षक यांची नोंदणी करण्यात येऊ नये याची कृपया नोंद घ्यावी.

केवळ ऑनलाईन नोंदणी तसेच शिक्षक नियुक्ती व मान्यता या संबधित माहितीसाठी दिलेल्या संकेतस्थळावर "Contact Us" टॅब मध्ये Helpline No. ०७७२२०६५२८३, ०७७२२०६५२८४ या नंबरवर आणि ईमेल support@muonline.org.in यावर संपर्क करावा.

(डॉ. बळीराम गायकवाड )
प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ